# मॅन, वुमन अँड चाईल्ड

मोहनतारा पाटील

रिया पब्लिकेशन्स्

६७८-ई, शामराव विठ्ठल बँकेच्याशेजारी,
शाहूपुरी २ री गल्ली, कोल्हापूर. ४१६००१.
riyapublications@gmail.com
www.ajabgroup.com

**मॅन, वुमन अँड चाईल्ड**
मोहनतारा पाटील

© **सुरक्षित**

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्,
६७८-ई, शामराव विठ्ठल बँकेच्याशेजारी,
शाहूपुरी २ री गल्ली, कोल्हापूर. ४१६००१.
riyapublications@gmail.com
www.ajabgroup.com

**लेखिका**
मोहनतारा पाटील

**अक्षरजुळणी**
अजब ग्राफिक्स

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर

**मुद्रक**
ऋग्वेद प्रिंटर्स, पुणे

**आवृत्ती**
ऑगस्ट २०१६

**किंमत**
₹ २५०/-

माझ्या जीवनात ज्यांनी अपार आनंद निर्माण केला
त्या माझ्या
चिरंजीव राजीव व स्नुषा सौ. कल्याणी आणि हा
आनंद परमानंदपदाला पोहोचविणारी माझी नातवंडं
चि. मधुवंती व चि. इंद्रनील यांना

**– मोहनतारा पाटील**

# एक

''शैलऽऽ'' रॉबर्ट बेकविथने आपल्या पत्नीला हाक मारली. त्यांना स्वत:चंच आश्चर्य वाटलं की विवाहाला दीड तप होत आलं तरी आपण आपल्या पत्नीमध्ये इतके कसे गुंतून राहिलो आहोत. साधं कॉलेजला जाताना शर्टाची बटनं लावण्यापासून ते रुमाल, लेक्चरची फाईल देण्यापर्यंत त्यांना त्यांची पत्नी हवी. आता ते चांगले दोन गोंडस, गोजिरवाण्या मुलींचे पिता होते. मोठी जेसिका बारा वर्षांची तर धाकटी पॉला दहा वर्षांची; पण छे, लाडक्या शैलशिवाय त्यांना काहीच जमत नसे.

हात पुसत पत्नी रॉबर्टजवळ आली.

''बॉब, उगाच काय रे हाक मारतोस. हे बघ, न्याहारीची तयारी करायला हवी ना, शिवाय जेस अन् पॉलाची शाळेची तयारी करायची.'' शैलनं कामाचा पाढा वाचला.

''शैल, अगं ही बटनं बघ, नीट करून दे. तो माझा निळा टाय कुठं आहे? लवकर बांधून दे ना,'' रॉबर्टने गयावया केली. ''शैल, आज दुपारी विभागाची मीटिंग आहे. खरं सांगतो असं वाटतं, पळत येऊन तुझ्या सहवासात रमावं, काय ते चर्वितचर्वण चालतं. छे, रूक्ष! त्यापेक्षा माझ्या लाडक्या सखीच्या प्रेमानं भारलेलं स्वर्गीय सुख देणारं चुंबन, साऱ्याला फिकं करून जाईल. हे आनंदाचे क्षण टिपण्याच्या ऐवजी उगाच चर्चा करीत बसायचं; पणऽऽ मी पडलो विभागीय प्रमुख, मुकाटपणे इतर प्राध्यापकांना तोंड देणे म्हणजे आलिया भोगासी असावे सादर. दुसरं काय!

''बॉब, पुरे हं !'' शर्टाची बटनं लावण्यासाठी शैल त्याच्याजवळ गेली मात्र बॉबने तिला कवेत घेतलं अन् तिच्यावर चुंबनांचा वर्षाव केला.

''बॉबऽऽ,'' घुसमटलेल्या आवाजात शैलनं त्याला बाजूला करण्याचा प्रयत्न केला.

''बॉब, असं रे काय, तुला उशीर होतोय ना?''

''शैल, तुझ्याशिवाय कशातच मन रमत नाही. इतका दीर्घकाळ गेलाय; पण तू मात्र नित्यनूतन राहिलीस गं. बघ, मी किती भाग्यवान, तुझ्यासारखी वेडावून टाकणारी पत्नी, दोन गोजिरवाण्या मुली. आनंद ओसंडून वाहतोय.''

''पुरे, पुरे ! जणू माझ्याशिवाय दुसऱ्या कोणत्याच स्त्रीकडे पाहिलंदेखील नाहीस कधी.''

''वाऽऽ माझ्या घरात एवढा खजिना असताना, दुसरीकडे पाहण्याची गरजच काय?''

''बरं, बरं, चल पाहू. न्याहारी कर, लवकरच निघायला हवं तुला, '' तिनं सुशील पत्नीप्रमाणे प्रेमळ आवाजात बॉबला समजावलं. तिला कवटाळणाऱ्या त्याच्या हातांना बाजूला करीत कसंबसं तिनं त्यांचा जामानिमा आवरला. ''पंचपक्वान्नानं पोट भरलं तर बाहेरचा साधा तुकडा कोण खाईल; तूच सांग.''

''पण... बाहेरही एखादं आवडतं पक्वान्न मिळालं तर खाल ना, महाराज?'' खोचक नजरेनं पाहात शैल म्हणाली.

''शैलऽऽ, आज का असा विचार तुझ्या मनात आला? माझ्यावर विश्वास आहे ना तुझा? तुझा बॉब असं करेल का? राणी, तुला सोडून असा विचारदेखील माझ्या मनात आला नाही गं. प्रिये, मी सर्वस्वी तुझाच अन् तुझाच राहीन.'' हिरमुसला बॉब म्हणाला.

त्याची काकुळत पाहून शैलचं मन द्रवलं आणि बॉबला दुखावलं हे पाहून तिला वाईट वाटलं.

''बॉब, लाडक्या, नाही रे, तू केवळ माझाच आहेस, याची पूर्ण खात्री आहे. माझी गंमत केली. हास पाहू,'' शैलनं त्याला जवळ ओढलं अन् त्यांचं एक दीर्घ चुंबन घेतलं.

बॉब हसला. त्यानं तिच्या मानेवर आपलं मस्तक घुसळलं. घट्ट कवटाळून, अतीव प्रेमाने तिच्यावर चुंबनांचा वर्षाव केला.

''मम्मीऽऽ'' पॉलाची हाक ऐकू आली. ती चटकन बाजूला झाली. पॉलानं पित्याच्या कवेतल्या मातेला पाहिलं खरं; पण त्या समजूतदार पोरीनं पाहिलं नाही असं दर्शविलं. बाजूला जाऊन, नंतर आताच येतेय असं भासविलं.

''मॉम, या शाळेच्या रिपोर्टवर तुझी सही हवीय,'' पॉला म्हणाली.

''बरं हं ! पॉला, बाबांचे लेक्चरचे कागद, रुमाल देऊन, दोन मिनिटात आलेच. न्याहारीच्या टेबलावर चल पाहू. सुरुवात कर,'' शैलनं समजावलं. शहाण्या मुलीसारखी मान डोलावत पॉला निघून गेली.

''हे बघ बॉब, आज लवकर...''

शैलचं वाक्य अर्धवट तोडत, जेसची हाक कानांवर आदळली.

''आले गंऽऽऽ,'' शैलनं प्रतिसाद दिला.

''माझे पांढरे पायमोजे कुठं आहेत?'' आतूनच जेसिकानं विचारलं.

''जेस, न्याहारी सुरू करा, मी आले की देतेच हं, सोने?''

टेबलाजवळ बसलेल्या दोन्ही भगिनी कुजबुजल्या.

''जेस, आई बाबांच्याजवळ गेली की, बाबा तिला सोडतच नाहीत. मी आता पाहिलं.'' पॉला म्हणाली.

''पॉला, अगं संध्याकाळपर्यंत बाबांना दूर जावं लागणार म्हणून ते आईला असं धरून ठेवतात. बाबांनादेखील कध्धी काही सापडत नाही. सगळं आईनंच करायचं. तसं बाबांचं आईवर फार प्रेम आहे,'' जेस म्हणाली.

जेसच्या मनात आता कुठं प्रेम या भावनेचा अंकुर फुटू पाहात होता. आईबाबांचं प्रेम तिला उमजू लागलं होतं.

शैलनं बॉबचा जामानिमा आवरला, अन् त्याच्या गळ्यात हात टाकून ती म्हणाली, ''बॉब, आज लवकर येशील का?''

''का गं, राणी?'' बॉबनं विचारलं.

''बॉब, असं रे काय करतोस? आजचा दिवस, आजचा दिनांक विसरलास? अहो विसराळू प्राध्यापक महाशय, आज विवाहाचा वाढदिवस, मस्त जेवण तयार ठेवते. मग आपण दोघं बाहेर जाऊ.''

''सॉरी राणी, असा सुंदर दिवस विसरण्याइतका का मी अरसिक आहे? तू ठरव त्याप्रमाणे करू. पण आज मीटिंग आहे. शक्यतो लवकर येण्याचा प्रयत्न करेन. चालेल ना लाडके,'' शैलने मान डोलावून संमती दर्शविली.

''बॉबऽऽ...'' शैलची हाक ऐकताच केस विंचरणारे बॉबचे हात थबकले.

''काय गं, राणी?'' बॉब गरकन् वळले अन् त्यांनी तिला पुन्हा कवटाळलं आणि तिच्या ओठांवर आपले ओठ टेकले.

''ऐक ना रे बॉब, तू मला बोलूच देत नाहीस,'' शैलनं तक्रार केली.

''बरं बोल, काय सांगत होतीस?'' इति बॉब.

''तुझ्या आवडीची एग करी व मसाला चिकन आहेच. आणखीन तुला काय आवडेल ते सांग ना?''

''सांगू? मला फक्त तू हवीस,'' आपल्याच वक्तव्यावर बॉब हसला.

''शैल, मला वाटतं, जगाच्या अंतापर्यंत तुला कवेत घेऊन असंच राहावं, बाकी काही नको. अगदी स्वर्गाचं राज्यसुद्धा तुझ्या बदल्यात मी घेणार नाही.''

''वाऽऽ, काय पण प्रेम! आजच एवढा प्रेमाचा पान्हा काय म्हणून फुटलाय, प्राध्यापक महाशय! विचार काय आहे? कोणती गोष्ट लपवायची आहे म्हणून माझ्यावरच्या प्रेमाचा जोरदार पुरस्कार चाललाय.'' शैलनं वेडावलं.

''ए शैल, लपवायचं! काय लपवायचं? माझं जीवन म्हणजे एक स्वच्छ आरसा. त्यात तू अन् मी. तुझ्यापासून एक दिवस तरी दूर राहिलोय काय?''

''वा रे वा! वॉशिंग्टन, न्यूयॉर्क, फ्रान्स वगैरे ठिकाणी लेक्चर द्यायला गेला होतास ना, बॉब? मग...''

''ए उगाच शंका काढू नकोस. तुझंच ध्यान करीत होतो तिकडे.''

बॉबचा स्वर जड झाला. शैल लगेच विरघळली.

''ए, बॉब, गंमत केली रे, माझ्या राजा, मी तुला ओळखत का नाही?''

दोघेही न्याहारीसाठी गेले. तिने आपल्या ओठांचा चंबू करून म्हटलं,

''बॉबऽऽ... तू मला भेटीदाखल काय देशील ते सांग.''

''माझ्या हृदयेश्वरीला काय हवं? तू मागशील ते देईन.''

''माझ्या मनात आलं ते देणं अशक्यच. मग उगाच कशाला तोंडाची वाफ दवडायची.'' ती रुसव्या स्वरात म्हणाली.

''माझ्या राणीसाठी हवा असेल तर आकाशीचा चंद्र आणू की रात्री नक्षत्रांनी भरलेल्या आकाशीच्या ताटातून मूठभर नक्षत्रंच तोडून तुझ्या केसावर माळू? सांग, तुला काय हवे?''

''ए बॉब, पुरे हं! उगाच नाटकातली वाक्यं म्हणू नकोस. मला गगनातलं काही नको. धरतीवरची एक गोष्ट हवी.''

''कोणती ते सांग ना?'' इति बॉब.

''बॉब...''शैलच्या मुद्रेवर लाली पसरली.

'' बॉब, आपल्याला एक मुलगा हवा ना!''

''ए वेडाबाई, इतक्या सुंदर, गोंडस मुली असताना, आता हे काय भलतंच मागितलंस.''

ती खळखळून हसत म्हणाली, ''गंमत रे, नको रे बाबा आणखी एक जबाबदारी. बरं चल पाहू, पोरी न्याहारीसाठी ताटकळत बसल्या असतील ना. त्यांना लवकर शाळेला जायचं आहे.''

''हो, हो, जशी राणीसाहेबांची आज्ञा.'' कौतुकाने तिच्या हातात हात घालून तो लगबगीनं न्याहारीसाठी आत गेला.

✦

डॉ. रॉबर्ट बेकविथना कधी सर्व आवरून घरी जातो असं वाटत होतं. लेक्चर्स संपवून विभागीय मीटिंगसाठी सभागृहात सारे जमले अन् अभ्यासक्रमाच्या बदलाबद्दल सारे हिरिरीने मुद्दे मांडू लागले.

ट्रिंगऽऽ ट्रिंगऽऽ ट्रिंगऽऽऽ

डॉ. बेकविथच्या डाव्या हाताला छोट्या टेबलावर असलेला फोन खणखणू लागला. त्यांनी उचलला.

''हॅलोऽऽ'' बेकविथनं प्रतिसाद दिला.

''डॉ. बेकविथ, एक अत्यंत महत्त्वाचा निरोप द्यायचा आहे.''

''आता मी एका कामात गुंतलो आहे. मी थोड्या वेळानं फोन करू का?''

''वास्तविक मला तुमच्याशी प्रत्यक्षच बोलायला आवडेल प्राध्यापकजी. अति महत्त्वाचं आहे. मी फ्रेंच कान्सुलेटमधून बोलतोय.''

टर्मची शेवटची मीटिंग चालू होती. त्यामध्ये अति महत्त्वाचे म्हणून डॉ. बेकविथना व्यत्यय येऊनही बोलावंच लागलं. कारण तो फ्रेंच कान्सुलेटकडून फोन होता. बेकविथचा नाइलाज होता.

''हॅलोऽऽ'' बेकविथनी गोंधळून प्रतिसाद दिला.

दुसऱ्या बाजूने कान्सुलेटमधील साहाय्यक सचिव बोलत होते. ''महाशय, पाच वाजण्यापूर्वी आपण बोस्टनला येऊ शकाल काय?''

''आता साडेचार वाजलेत मग...'' बॉब म्हणाले.

''मी आपली प्रतीक्षा करतोय.'' तिकडून शब्द आले.

''एवढं महत्त्वाचं आहे काय?'' बॉबचा प्रश्न.

''हो, मला खात्रीनं तसं वाटतंय.''

इतकं अतीव महत्त्वाचं काय असावं बरं? या प्रश्नाचा भुंगा त्याचं डोकं पोखरू लागला. बॉब पूर्णत: गोंधळून गेला.

सारं कसं धूसर वाटू लागलं. जणू पुढील सारं जणू धुक्यात हरवलेल्या वाटेप्रमाणं दिसू लागलं. आपल्या विचारचक्रासह तो पुन्हा सभागृहातील आपल्या खुर्चीत बसला. संख्याशास्त्र विभागाचे प्राध्यापक त्याच्याकडे कुतूहलाने निरखून

पाहू लागले. येथून आपण बाहेर पडलंच पाहिजे, हे ओळखून बॉबने उरलेली चर्चा फारशी महत्त्वाची नाही असे दाखवून दिले. आणि आताची बैठक तहकूब करावी अशी सूचना मांडून त्याला फारसा विरोध दर्शविला गेला नसल्याने बॉबना बरे वाटले.

''डॉ. बेकविथ, मला येथे नमूद करावेसे वाटते की, हे व्यवसायाला धरून, योग्य ठरणारे नाही.'' पी. हर्बर्ट हॅरिसन करवादले.

''मग, चला आपण मताला टाकूया. ठीक ना?'' बॉब उत्तरले.

पाच विरुद्ध एक या मताने तहकुबी सूचना मान्य झाली.

बॉब धावतच आपल्या गाडीकडे गेला.

रस्त्यात कोण गर्दी होती; चार्ल्स नदीकाठाने गर्दीतून मार्ग काढीत बॉबने आपली गाडी हाकारली. पण गाडीला वेग घेणे दुरापास्त होते. फ्रेंच व्यापार विभागातील अधिकाऱ्याचे असे काय अति महत्त्वाचे काम असणार याचा विचार करीत राहिला. जसजसा ते विचार तर्क करीत होता, तसा एकाच कल्पनेवर त्याचा विचार अडखळू लागला. नाहीतर फ्रेंच व्यापार विभागाचे त्याच्याकडं काय काम असणार.'लेजन ऑफ ऑनर' हा किताब त्यांना मला बहाल करावयाचा असेल, हा विचार त्याला पटू लागला. हे सहज शक्य आहे, असे स्वत:ला बजावू लागला. नाहीतर व्याख्यानं देण्यासाठी तो सोरबॉनला फ्रान्स येथे दोनदा जाऊन आला होता. आता नक्की हेच महत्त्वाचे काम असावे असे त्याचे मन ग्वाही देऊ लागले. लाल पट्टीवरील सोनेरी अक्षरातील तो किताब आपल्याला मिळेलच याची खात्री वाटू लागली आणि आपण आता जाकिट घालायला सुरुवात करायला हवी. असा अचानक पेहराव बदलला तर... मी कशाला पर्वा करावी? उलट आपल्या सहकारी प्राध्यापकांच्या चेहऱ्यावरची असूया पाहणं मला खूपच आवडेल, आणि माझं कुटुंब, बापरे!... शैल अन् मुलींना तर केवढा अभिमान वाटेल आपल्याबद्दल. तो कसातरी फ्रेंच कान्सुलेटला पोहोचला.

''हा संदेश आम्हाला तारफोनवरून मिळालाय.'' श्री. एम. बर्ट्रांड पेलेशियर फ्रेंच व्यापार विभागातले साहाय्यक अधिकारी म्हणाले. गोंधळून गेलेला बॉब पेलेशियार यांच्या त्या भव्य ऑफिसात त्यांच्यासमोरील उंच छताला टांगलेल्या झुंबरांनी सजविलेल्या, त्याच्यासमोरील प्रशस्त खुर्चीत धडधडणाऱ्या हृदयाला सांभाळीत बसला. पेलेशियरनी हातात एक तारेचा मजकूर असलेला कागदाचा तुकडा धरला होता.